# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २९/०३/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

### मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत गिरड रोडवर आंबेडकर भवन चे गेटजवळ उमरेड येथे दिनांक १६/०३/२२ चे ०६.१५ वा. ते १८.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे— संदिप कृष्णाजी गोवर्धन, वय ३० वर्ष, रा. पवनी ता पवनी, जि. भंडारा ह.मु. आशुतोष झाडे यांचे राहते घरी मंगाळवारपेठ चंद्रा मेडीकल जवळ हे आपली एमएच— ४०/बीक्यु— ०२२५ क्रमांकाची मोटरसायकल ही आंबेडकर भवन चे गेटजवळ लावुन ट्रान्सपोर्टचे ट्रक मध्ये बसुन गोकुल खदान पिरावा येथे गेले. फिर्यादी हे सायंकाळी ०६.०० वा. कोळश्याचा ट्रक घेवुन वेकोली उमरेड येथे परत आले असता त्यांची कि. ३०,०००/—रू. ची मोटरसायकल दिसुन न आली नाही. मोटरसायकलची मागील ०३ महीन्यापासुन ईस्टॉलमेंट फिर्यादीने भरली नव्हती. त्यामुळे मोटरसायकल ही फायनंस कंपनीने नेली असावी असे फिर्यादीला वाटल्याने नागपुर वाडी येथील फायनंस कंपनीमध्ये जावुन विचारपुस केली. परंतु तेथील गाडी कुणीही नेली नसल्याचे माहीत पडले. फिर्यादींची कि. ३०,०००/—रू. ची मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मनोज वाघ मो नं. ९४२०७५६७५१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ कि. मी. गुमथळा येथे दिनांक २७/०३/२२ चे २०.०० वा. ते २१.३० वा. चे सुमारास फिर्यादी नामे— रमेश भिमाजी कोसरे, वय ४५ वर्ष, रा. गुमथळा ता. कामठी यांच्या कडे स्प्लेंडर कंपनीची काळया रंगाची पाढरे पट्टे असलेली एम.एच—४०/बी.झेड— ७४८० क्रमांकाची मोटरसायकल ही फिर्यादी दिवसभर घरी असल्यामूळे मोटरसायकल ही घरीच होती. रात्री अंदाजे २१.३० वा. दरम्यान मोटरसायकल बघितली असता ती ठेवलेल्या ठिकाणी दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. ४०,०००/— रू. मोटरसायकल चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार देवीदास पवार मो. क्र. ९८२३०३७२७९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर